सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ४० ] सोमवार, फेब्रुवारी २२, २०१०/फाल्गुन ३, शके १९३१ [ पृष्ठे ४, किंमत रुपये २६.००

असाधारण क्रमांक ४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.—** मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | पृष्ठे १-४ |

विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ फेब्रुवारी २०१०.

## MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2010.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY COURT-FEES ACT, 1959.

## सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.

**मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

२००९ चा महा. अध्या. १२. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक ११ ऑगस्ट २००९ रोजी प्रख्यापित केलेला मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अध्यादेश, २००९ हा दिनांक १ सप्टेंबर २००९ पासून अंमलात आला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक ८ डिसेंबर २००९ रोजी पुन्हा भरविण्यात आलेल्या राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये, उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतरित करण्यासाठी महाराष्ट्राच्या

विधानसभेमध्ये मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २००९ (सन २००९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९) हे दिनांक ८ डिसेंबर २००९ रोजी मांडण्यात आले होते ; तथापि, दिनांक २३ डिसेंबर २००९ रोजी राज्य विधानमंडळाची सत्र समाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक ११ ऑगस्ट २००९ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी उक्त अध्यादेश प्रख्यापित केला होता ; आणि या दरम्यान दिनांक ९ नोव्हेंबर २००९ रोजी महाराष्ट्र विधानसभा पुन्हा भरविण्यासाठी बोलाविण्यात आली होती आणि दिनांक ११ नोव्हेंबर २००९ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद पुन्हा भरविण्यासाठी बोलाविण्यात आली होती ; भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (२) मधील स्पष्टीकरणामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार, उक्त अध्यादेश दिनांक ११ नोव्हेंबर २००९ पासून सहा आठवडे समाप्त झाल्यावर म्हणजेच दिनांक २२ डिसेंबर २००९ नंतर अंमलात असणे बंद झाले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, मुंबई न्यायालय-फी (सुधारणा आणि त्या चालू राहणे) अध्यादेश, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ सप्टेंबर २००९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

**२.** मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या अनुसूची एक मध्ये,— १९५९ चा मुंबई ३६.

(क) अनुच्छेद ३ मधील, " लवाद अधिनियम, १९४० अन्वये दिलेल्या निवाड्याव्यतिरिक्त इतर " हा मजकूर वगळण्यात येईल ; १९४० चा १०.

(ख) अनुच्छेद ३ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येईल :—

| | | |
|---|---|---|
| " ३अ. | लवाद व समेट अधिनियम, १९९६ अन्वये लवाद निवाडा रद्द ठरविण्यासाठी किंवा त्यात सुधारणा करण्यासाठी केलेला अर्ज किंवा विनंती अर्ज (अपील अर्ज धरून). | . . जो निवाडा रद्द करण्यासाठी किंवा त्यात सुधारणा करण्यासाठी अर्ज दिला असेल त्या निवाड्यातील रकमेवरील किंवा मूल्यावरील यथामूल्य फी च्या एक द्वितीयांशा इतकी फी, अनुच्छेद १ अन्वये विहित केलेल्या प्रमाणानुसार. ". |

१९९६ चा २६.

सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अध्यादेश, २००९, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००९ चा महा अध्या.१२.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाअन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, या अध्यादेशान्वये सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आलेली कृती किंवा, यथास्थिती, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## निवेदन.

राज्य शासनाद्वारे, न्यायदानावर केला जाणारा खर्च काही प्रमाणात भागविण्यासाठी मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ (१९५९ चा मुंबई ३६) अन्वये न्यायालय-फी आकारण्यात येते. गेल्या पन्नास वर्षांमध्ये न्यायदानावरील खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. हा अवाढव्य खर्च भागविण्यासाठी २००२ या वर्षामध्ये, न्यायालय-फीच्या दरात वाढ करण्यात आली होती. तथापि, एकंदरीत अर्थव्यवस्थेतील चलनवाढीचा कल आणि पैशाच्या मूल्यात झालेली लक्षणीय घट लक्षात घेता, असे आढळून आले होते की, न्यायदानावर होणारा अवाढव्य खर्च अंशत: भागविण्यासाठी न्यायालय-फी मध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे.

२. लवाद व समेट अधिनियम, १९९६ च्या प्रारंभानंतर असे दिसून आले आहे की, अनेक अर्ज किंवा विनंती अर्ज (अपिलांसह) रद्द करण्याच्या किंवा लवाद निवाड्यामध्ये फेरबदल करण्याच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ मध्ये अशा अर्जावर किंवा विनंती अर्जावर व अपिलांवर न्यायालय-फी बसविण्यासाठी कोणताही विनिर्दिष्ट अनुच्छेद नसल्यामुळे, निवाडा रद्द करण्यासाठी किंवा त्यात फेरबदल करण्यासाठी अनुच्छेद १ अन्वये विहित केलेल्या प्रमाणानुसार, निवाड्यातील रकमेवर किंवा मूल्यावर, यथामूल्य एक द्वितीयांश दराने न्यायालय-फी बसविण्याची तरतूद करण्यासाठी आणि त्याद्वारे, न्यायदानावर होणारा खर्च काही प्रमाणात भागविण्यासाठी शासनाने त्यात विनिर्दिष्ट अनुच्छेदाचा समावेश करणे अत्यावश्यक झाले होते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी मुंबई न्यायालय-फी अधिनियम, १९५९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक ११ ऑगस्ट २००९ रोजी मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अध्यादेश, २००९ (सन २००९ चा महा. अध्या. १२), हा प्रख्यापित केला होता.

४. त्यानंतर, माननीय राज्यपालांनी, दिनांक ८ डिसेंबर २००९ रोजी राज्य विधानमंडळाचे रितसर अधिवेशन बोलावले होते आणि उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतरित करण्यासाठी दिनांक ८ डिसेंबर २००९ रोजी महाराष्ट्र विधानसभेमध्ये सन २००९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ म्हणून विधेयक मांडण्यात आले होते. तथापि, दिनांक २३ डिसेंबर २००९ रोजी राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती झाल्यामुळे, उक्त विधेयक महाराष्ट्र विधानसभेत संमत होऊ शकले नाही. या दरम्यान, महाराष्ट्र राज्य विधानसभा दिनांक ९ नोव्हेंबर २००९ रोजी पुन्हा भरविण्यात आली होती व दिनांक ११ नोव्हेंबर २००९ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद पुन्हा भरविण्यात आली होती. म्हणून, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (२) मधील स्पष्टीकरणातील तरतुदींअन्वये दिनांक ११ नोव्हेंबर २००९ पासून सहा आठवडे समाप्त झाल्यावर म्हणजेच दिनांक २२ डिसेंबर २००९ नंतर उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले आहे आणि अध्यादेश पुन्हा प्रख्यापित करून, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असणे चालू राहणे इष्ट वाटत आहे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी मुंबई न्यायालय-फी (सुधारणा) अध्यादेश, २००९ (२००९ चा महा. अध्या. १२) च्या तरतुदी अंमलात असणे चालू रहावे यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १८ फेब्रुवारी २०१०.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एम. एन. गिलानी,**
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ५८ ] सोमवार, फेब्रुवारी २२, २०१०/फाल्गुन ३, शके १९३१ [ पृष्ठे ५, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ४


## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Court-fees (Amendment and Continuance) Ordinance, 2010 (Mah. Ord. III of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Bombay Court-fees (Amendment and Continuance) Ordinance, 2010 (Mah. Ord. III of 2010), published under the authority of the Governor.]

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 22nd February 2010.

## MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2010.

*AN ORDINANCE*

*further to amend the Bombay Court-fees Act, 1959.*

WHEREAS the Governor of Maharashtra had promulgated the Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2009, on the 11th August 2009, which had come into force on the 1st September 2009; (Mah. Ord. XII of 2009.)

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 8th December 2009, the Bombay Court-fees (Amendment) Bill, 2009

(L. A. Bill No. XIX of 2009), for replacing the said Ordinance by an Act of the State Legislature was introduced in the Maharashtra Legislative Assembly on the 8th December 2009, however, the said Bill could not be passed by the Maharashtra Legislative Assembly as the session of the State Legislature was prorogued on the 23rd December 2009;

AND WHEREAS the said Ordinance was promulgated by the Governor of Maharashtra on the 11th August 2009 and thereafter, in the meanwhile, the Maharashtra Legislative Assembly was summoned to reassemble on the 9th November 2009 and the Maharashtra Legislative Council was summoned to reassemble on the 11th November 2009, as provided by the *Explanation* to clause (2) of the article 213 of the Constitution of India, the said Ordinance has ceased to operate at the expiration of six weeks from the 11th November 2009, that is, after the 22nd December 2009 ;

AND WHEREAS it is considered expedient to continue the operation of the provisions of the said Ordinance ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the said Ordinance, for the purposes hereinafter appearing ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause *(1)* of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely:—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Ordinance may be called the Bombay Court-fees (Amendment and Continuance) Ordinance, 2010.

*(2)* It shall be deemed to have come into force on the 1st September 2009.

Amendment of Schedule I to Bom. XXXVI of 1959.

**2.** In Schedule I to the Bombay Court-fees Act, 1959 (hereinafter referred to as "the principal Act"), Bom. XXXVI of 1959.

*(a)* in article 3, the words and figures "otherwise than under the Arbitration Act, 1940" shall be deleted ; X of 1940.

(*b*) after article 3, the following article shall be inserted, namely :—

| | | |
|---|---|---|
| "3A. Application or petition (including Memorandum of Appeal) to set aside or modify arbitral award under the Arbitration and Conciliation Act, 1996. | ........ | A fee of one-half of the *ad valorem* fee on the amount or value of the award sought to be set aside or modified, according to the scale prescribed under Article 1.". |

26 of 1996.

Mah. Ord. XII of 2009.

Repeal of Mah. Ord. XII of 2009 and saving

**3.** (*1*) The Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2009, is hereby repealed.

(2) Notwithstanding such repeal, anything done or any action taken under the said Ordinance shall be deemed to have been done or taken, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Ordinance.

STATEMENT

Under the Bombay Court-fees Act, 1959 (Bom. XXXVI of 1959), the Court-fees are charged, to meet to some extent, the expenditure being incurred by the State Government on the Administration of Justice. In the last fifty years, the expenditure on the Administration of Justice has increased enormously. To meet part of this huge expenditure, the rates of Court-fees were increased in the year 2002. However, it was found that having regard to the overall inflationary trends in the economy and remarkable fall in the value of money, it is imperative to increase the Court-fees to partially meet the huge expenditure on the Adminisration of Justice.

2. It is observed that after the commencement of the Arbitration and Conciliation Act, 1996, the number of applications or petitions (including appeals) to set aside or modify arbitral awards are tremendously increased. As there was no specific article in the Bombay Court-fees Act, 1959 to levy Court-fees on such applications or petitions and appeals, it had become imperative for the Government to incorporate specific article providing for levy of Court-fee at the rate of one-half of the *ad valorem* fee on the amount or value of the award sought to be set aside or modified according to the scale prescribed under Article 1, and thereby to some extent meet the expenditure on the Administration of Justice.

3. As both Houses of the State Legislature were not in session and the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Court-fees Act, 1959, for the purposes aforesaid, the Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. XII of 2009), was promulgated by the Governor of Maharashtra, on the 11th August 2009.

4. Thereafter, the regular session of the State Legislature was convened by the Hon'ble Governor on the 8th December 2009, and a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in the Maharashtra Legislative Assembly as L.A. Bill No. XIX of 2009 on the 8th December 2009. However, the said Bill could not be passed by the Maharashtra Legislative Assembly, as the session of the State Legislature was prorogued on the 23rd December 2009. In the meanwhile, as the Maharashtra Legislative Assembly was summoned to reassemble on the 9th November 2009 and the Maharashtra Legislative Council was summoned to reassemble on the 11th November 2009, as provided by the *Explanation* to clause (2) of article 213 of the Constitution of India, the said Ordinance has ceased to operate at the expiration of six weeks from the 11th November 2009, that is after the 22nd December 2009, and it is considered expedient that the provisions of the said Ordinance should be continued by re-promulgation of the Ordinance.

5. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to continue the provisions of the Bombay Court-fees (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. XII of 2009), this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 18th February 2010.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the
Governor of Maharashtra.

M. N. GILANI,
Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.